बार्शी शहर व परिसराच्या विकासात वीरशैव लिंगायत समाजाचे योगदान - एक चिकित्सक अभ्यास (इ.स. १८०० ते २०००)

सामाजिक विद्या शाखेअंतर्गत

इतिहास विषयातील पीएच.डी. पदवीसाठी

करावयाच्या संशोधनाची रुपरेषा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मार्गदर्शक

डॉ. विजय पांडुरंगराव कुलकर्णी

वै.धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालय, देगलुर

संशोधक

प्रा.श्री.पंतुलवार रामप्पा गंगाधरप्पा

के.एन.भिसे कॉलेज, कुर्डूवाडी

सन २०१६-१७

बार्शी शहर व परिसराच्या विकासात वीरशैव लिंगायत समाजाचे योगदान - एक चिकित्सक अभ्यास (इ.स. १८०० ते २०००)

प्रास्ताविक :-

प्राचिन काळापासून महाराष्ट्रात हिंदू, जैन, बौध्द, पारशी, मुस्लिम व वीरशैव लिंगायत इ. वेगवेगळ्या धर्माचे लोक गुण्यागोविंदाने एकत्र नांदत आहेत. यामुळे विविधतेतून एकता व एकतेतुन विविधता हे महाराष्ट्रीय समाजाचे एक प्रमूख वैशिष्ट्य बनले आहे. वीरशैव लिंगायत हा भारतातील एक स्वतंत्र संप्रदाय असून या संप्रदायाच्या उदयासंदर्भात विचारवंतांमध्ये फार मोठ्या प्रमाणात मतभेद असले तरीही या संप्रदायाचा उदय आजच्या कर्नाटक राज्यात झाला हे सर्वमान्य आहे. कर्नाटकात उदयास आलेल्या या धर्माचा प्रसार मात्र कमी अधिक प्रमाणात संपुर्ण भारतात झालेला आहे. विशेषतः दक्षिण भारतात महाराष्ट्र, कर्नाटक व तेलंगणा या राज्यात वीरशैव लिंगायत अनुयायांची संख्या फार मोठ्या प्रमाणात आहे.

महाराष्ट्रात वीरशैव लिंगायत समाज मोठ्या प्रमाणात वास्तव्य करुन आहे. कर्नाटक राज्याच्या सिमेला लागुन असलेले जिल्हे विशेषतः पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापुर, सातारा, सांगली व कोल्हापूर याशिवाय मराठवाड्यातील नांदेड व लातुर इ. जिल्ह्यात वीरशैव समाज फार मोठ्या प्रमाणात आढळतो. कर्नाटकातील वीरशैव समाजाने कर्नाटकाच्या ऐतिहासिक वाटचालीत दिलेल्या योगदानावर फार मोठ्या प्रमाणात संशोधनपर लिखान झाले व ते फार मोठ्या प्रमाणात प्रकाशितही करण्यात आले. मात्र महाराष्ट्रात वीरशैवांची संख्या मोठी असुन त्यांनी महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकिय व आर्थिक विकासात मोठ्या प्रमाणात योगदानही दिले आहे. मात्र अद्याप त्यासंदर्भात पुरेसे संशोधनपर लिखान झाले नाही.

सोलापूर जिल्ह्यातील डॉ.शे.दे.पसारकर, नागपूर येथील डॉ.सुधाकर मोगलेवार व डॉ.अशोक मेणकुदळे, औरंगाबाद येथील डॉ.यु.म.पठाण, पुणे येथील डॉ.श्यामा घोणसे,

गुलबर्गा येथील डॉ.चंद्रशेखर कपाळे इ. मराठी विषयाच्या प्राध्यापकांनी साहित्यिक दृष्टिकोनातुन महाराष्ट्रात वीरशैव लिंगायत समाजाच्या कामगिरीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे. डॉ.रा.चीं. ढेरे यांच्या लिखाणात वीरशैव लिंगायता बद्दल कांही संदर्भ आढळतात. तसेच बार्शी येथील समाजशास्त्र विषयाचे प्रा.सुर्यकांत घुगरे यांनी समाजशास्त्रीय तर लातुर जिल्ह्यातील अहमदपुर येथील शिवलिंग शिवाचार्य महाराजांनी आध्यात्मिक दृष्टीकोनातून महाराष्ट्रातील वीरशैव समाजाच्या कामगिरीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

वीरशैव लिंगायत समाजाच्या योगदानाबाबत साहित्यिक, समाजशास्त्रीय व आध्यात्मिक दृष्टीकोनातून संशोधन व लिखाण झाले आहे. मात्र अद्याप महाराष्ट्रातील वीरशैव समाजाच्या भुतकालीन वाटचालीवर ऐतिहासिक, प्रादेशिक, स्थानिक दृष्टीकोनातुन अद्याप फारसे संशोधनपर लिखाण झाले नाही. म्हणून महाराष्ट्राच्या ऐैतिहासिक वाटचालीत वीरशैव लिंगायत समाजाने दिलेल्या योगदानावर स्थानिक, प्रादेशिक व ऐैतिहासिक दृष्टीकोनातुन प्रकाश टाकण्यासाठी अशा प्रकारचे संशोधन गरजेचे वाटते.

महाराष्ट्रातील वीरशैव समाज आर्थिकदृष्ट्या सुस्थितीत असुन तो सर्वसाधारणपणे लिंगायत या नावाने ओळखला जातो. बहुसंख्य वीरशैव समाज व्यापार, शेती, उद्योगधंदे या गुंतेलेल असुन वर्ण व्यवस्थेतील वैश्याची भुमिका तो पार पाडत आहे. यामुळे महाराष्ट्रातील वीरशैव समाज केवळ पुड्या बांधण्यातच मग्न होता. त्याने महाराष्ट्राच्या राजकीय, सांस्कृतिक, सामाजिक विकासात विशेष योगदान दिले नाही, अशा प्रकारचा गैरसमज इतर समाजाच्या लोकांमध्ये दिसतो. मात्र वस्तुस्थिती अशी आहे की, महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासात इतर समाजाने जितके योगदान दिले आहे, तितकेच बहुमूल्य योगदान महाराष्ट्रातील वीरशैव समाजाने दिले आहे. राणी चिन्नमा, सावित्रीबाई देसाई, सोलापूरचे

देशमुख घराणे, कोल्हापुरचे कोरे घराणे, शिखर शिंगणापुरचे जंगम घराणे शिवाय देवराज (यादवाचा महाप्रधान) चाऊंडरस (यादवांचा सेनापती) इ. उदाहरणे देता येतील.

पश्चिम महाराष्ट्रात विशेषतः सोलापुर जिल्ह्यात वीरशैव अनुयायांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. बार्शी हे शहर सोलापुर जिल्ह्यातील सर्वात मोठा तालुका असुन एक व्यापारी पेठ, सांस्कृतिक व राजकीय घडामोडीचे केंद्र म्हणुन प्रसिध्द आहे. मराठवाड्याच्या प्रवेशद्वारावरील एक प्रमुख शहर आणि पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा यांना जोडणारा दूवा म्हणून प्रसिध्द आहे. येथे लिंगायत, मुस्लिम, हिंदू, ख्रिश्चन, बौद्ध, जैन धर्माचे अनुयायी एकदिलाने व सौहार्दाने राहतात. प्राचिन काळापासुन या शहराने इतिहासावर आपल्या कर्तृत्वाची छाप सोडलेली आहे. येथे वीरशैव लिंगायत समाजाच्या अनुयायांची संख्या फार मोठ्या प्रमाणात आहे. या शहराच्या विकासात इतर समाजाच्या लोकांबरोबरच वीरशैव लिंगायत लोकांचा सहभाग होता का? होता तर कोणत्या कोणत्या क्षेत्रात व कशा स्वरुपाचे होते? या समाजाचा इतर समाजाकडे व इतर समाजाचा या समाजाकडे बघण्याचा दृष्टिकोन कसा होता. अशा सर्व प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी प्रस्तुत संशोधनासाठी हा विषय निवडण्यात आला आहे.

कर्नाटकाशी लागुन असलेल्या सिमावर्ती जिल्ह्यात बहुल तर अन्य जिल्ह्यात विरळ संख्येने राहत असलेल्या लिंगायत जाती जमातीची एकूण लोकसंख्या महाराष्ट्रात एक ते सव्वा कोटीच्या आसपास आहे. भारतात लिंगायत समाज लोकसंख्येच्या बाबतीत महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. लिंगायत पंचम, लिंगायत माळी, लिंगायत कुंभार, लिंगायत तेली, लिंगायत परिट, रेड्डी, गवळी, साळी, शिंपी, लिंगायत सुतार, लिंगायत न्हावी, हरळय्या चांभार, ढोर ककय्या, लिंगायत बुरूड, जंगम अशा अनेक उपजाती लिंगायत वीरशैव लिंगायत समाजात निर्माण झाल्या आहेत. या जातींनी भुतकाळात कधीतरी लिंगायत धर्माचा स्वीकार केला आहे. त्याचे धार्मिक, सामाजिक, चालीरिती लिंगायत धर्माप्रमाणे आहे. मात्र

लिंगायत धर्माचा स्विकार करुनही त्यांची पुर्वीचे जातीचे आवरण गेले नाही. त्याना बसवेश्वराच्या समतावादी, जातीविरोधी, वर्णविरोधी, अवैदिक तत्त्वज्ञानाची विसर पडली आहे. यामूळे यामध्ये समन्वय राहिले नाही. प्रत्येकाने आपआपल्या स्वतंत्र चुली मांडल्या आहेत. या समाजाला त्याच्या पुर्वजांच्या कर्तृत्त्वाची माहिती व खऱ्या लिंगायत धर्माच्या तत्त्वज्ञानाची ओळख करुन त्याच्यात समन्वय साधण्यास मदत करण्यासाठी प्रस्तुत संशोधनाची गरज वाटते.

वीरशैव लिंगायत सारखा दुर्लक्षित मात्र महाराष्ट्राच्या इतिहासात बहुमूल्य योगदान देणाऱ्या समाजघटकांचा अभ्यास करण्यासाठी जागतिक इतिहासात सबाल्टर्न किंवा वंचितांचा इतिहास या नवीन इतिहास लेखन प्रवाहाचा उदय झालेला आहे. यातुन प्रेरणा घेऊन महाराष्ट्रातील विशेषतः बार्शी परिसरातील वीरशैव लिंगायत धर्माच्या अनुयायांच्या कामगिरीवर प्रकाश टाकण्यासाठी प्रस्तुत संशोधनासाठी हा विषय निवडण्यात आला आहे.

महाराष्ट्रातील वीरशैव लिंगायत समाजाचा विस्तार व कार्य फार मोठ्या प्रमाणात आहे. मात्र त्याच्या कार्याचा विस्तृत संशोधन व्हावे म्हणुन मी माझ्या संशोधनाचे कार्यक्षेत्र बार्शी शहर व परिसरापुरते मर्यादीत ठेवले आहे. शिवाय या परिसरात या समाजाची संख्या लक्षणीय असून ती कार्यक्षम आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :-

१) वीरशैव लिंगायत समाजाचा प्रसार व प्रचार महाराष्ट्रात कसा झाला यावर प्रकाश टाकणे.

२) बार्शी शहराच्या परिसरातील वीरशैव समाजाने बार्शीच्या पर्यायाने महाराष्ट्राच्या आर्थिक, सांस्कृतिक विकासात दिलेल्या योगदानाचा शोध घेणे.

३) बार्शी शहरात शेकडो वर्षापासुन अस्तित्वात असलेल्या वीरशैव लिंगायत धर्माच्या १२ मठांची व त्याच्या कामगिरीवर प्रकाश टाकणे.

४) बार्शी शहरात वीरशैव समाजाने पत्रकारितेच्या क्षेत्रात फार मोठे योगदान दिले आहे. त्यावर प्रकाश टाकणे.

५) बार्शी शहराच्या राजकिय घडामोडीवर वीरशैवांचा फार मोठा प्रभाव होता तो अधोरेखित करणे.

६) बार्शी शहर व परिसरात शैक्षणिक संस्था स्थापन करुन वीरशैव लिंगायतांना भारतीय समाजाच्या शैक्षणिक विकासात हातभार लावला त्यावर प्रकाश टाकणे.

७) बार्शी शहरातील वीरशैवांनी महाराष्ट्राच्या साहित्यिक वैभवात दिलेल्या योगदानाचा शोध घेणे.

८) स्थानिक इतिहास लेखनाद्वारे बार्शी शहराचा प्रारंभिक इतिहास रेखाटणे.

९) वीरशैव लिंगायत समाजाची मुळ विचारसरणी समताधिष्ठीत जात, वर्ण विरोधी अंधश्रध्दा व कर्मकांड विरोधी आहे याची ओळख बार्शीतील वीरशैव लिंगायत समाजाच्या अनुयायांना करुन देवुन त्यांना बसव तत्त्वाकडे घेऊन जाणे.

१०) बसव तत्त्वानुसार स्त्री-पुरुष समान आहेत. यानुसार बार्शी परिसरातील वीरशैव लिंगायत समाजातील महिलांनी बार्शीतील सर्व समाजाच्या विकासाकरीता दिलेले योगदान व सद्यस्थिती यावर प्रकाश टाकणे.

११) वीरशैव लिंगायत समाजाबाबत असलेले गैरसमज दूर करणे.

संशोधन विषयाची आवश्यकता :-

१) भारतात कर्नाटक राज्यानंतर महाराष्ट्रात वीरशैव लिंगायत समाजाची संख्या सर्वाधिक आहे. मात्र त्याच्या ऐतिहासिक वाटचालीवर महाराष्ट्रात फारसे संशोधन झाले नाही ते होणे गरजेचे आहे.

२) बार्शी शहराचे स्थानिक इतिहास रेखाटने व त्यामध्ये वीरशैव लिंगायताचे योगदान प्रकाशित करणे गरजेचे आहे.

३) बार्शी शहराच्या सांस्कृतिक व आर्थिक विकासात वीरशैव लिंगायत समाजाने बहुमूल्य असे योगदान दिले आहे यावर प्रकाश टाकणे.

४) बार्शी शहरात वीरशैव लिंगायत समाजाचे पुत्रवर्गीय व शिष्यवर्गीय परंपरा जपणारे १२ मठ आहेत. याद्वारे बार्शी शहराच्या सांस्कृतिक व धार्मिक विकासासाठी बहुमूल्य असे योगदान दिले गेले याचा अभ्यास करणे आवश्यक वाटते.

५) बार्शी शहराच्या राजकारणात वीरशैव लिंगायत समाजाने फार मोठे योगदान दिले आहे. येथील नगरपालिका व पंचायत समिती व विधान सभेच्या जागेवर वीरशैव समाजाचे वर्चस्व राहीले आहे. त्या संदर्भात संशोधन करणे गरजेचे वाटते.

६) बार्शी शहराच्या पत्रकारीतेच्या क्षेत्रात वीरशैव लिंगायत समाजाचा प्रचंड प्रभाव दिसून येतो या संदर्भात संशोधन करुन प्रकाश टाकणे आवश्यक वाटते.

७) बार्शी शहर व परिसरातील वीरशैव लिंगायत समाजातील अनुयायांनी अनेक शैक्षणिक संस्था, पाठशाळा, बोंर्डींग्ज स्थापन करुन शिक्षणाचा प्रसार केला. त्यावरही प्रकाश टाकणे गरजेचे आहे.

८) बार्शी येथील वीरशैव लिंगायत समाजातील कथले व हिरेमठ कुटुंबांनी बार्शी शहरात अनेक दवाखान्यांची स्थापना करुन बार्शी शहराच्या आरोग्य सुविधांच्या विकासासाठी योगदान दिले. ते प्रकाशात येणे महत्वाचे वाटते.

९) बार्शीतील पर्यायाने महाराष्ट्रातील वीरशैव लिंगायत समाज केवळ व्यापारात मग्न होता. अशा प्रकारचे गैरसमज इतर समाजामध्ये दिसून येते. मात्र त्यांची ही धारणा चुकीची आहे हे सिध्द करुन सत्यावर प्रकाश टाकण्यासाठी प्रस्तुत संशोधनाची गरज आहे.

१०) महाराष्ट्रात वीरशैव लिंगायत समाज मोठ्या प्रमाणात असूनही संशोधनपर लिखाणाच्या अभावी तो अल्पसंख्याक समजून दुर्लक्षित राहीला अशा दुर्लक्षित समाजघटकाच्या अभ्यासाकरीता आधुनिक इतिहास लेखनशास्त्रात 'सबाल्टर्न' किंवा 'वंचिताचा इतिहास' या नवीन इतिहास लेखन प्रवाहाचा उदय झालेला आहे. या दृष्टीकोनातूनही अशा प्रकारच्या संशोधनाची आवश्यकता वाटते. वीरशैव लिंगायत समाजातील स्त्रीयांनी बार्शी शहराच्या विकासात वेगवेगळ्या अंगांनी योगदान दिले आहे. स्त्रीयांच्या योगदानाचा अभ्यास करणाऱ्या 'स्त्रीवाद' या नवीन इतिहास लेखन दृष्टीकोनानुसार त्यांच्या योगदानाचा अभ्यास करणे गरजेचे वाटते.

११) महाराष्ट्रातील वीरशैव समाजाच्या भुतकालीन वाटचालीवर फारसे संशोधनपर लिखाण न झाल्यामुळे या समाजाची स्थिती स्मृती हरवलेल्या व्यक्तीसारखी झाली आहे. त्यामुळे या समाजास त्यांच्या मुळ विचारसरणी व धार्मिक तत्त्वज्ञानाचा विसर पडला आहे. तो समतावादी, जातीवाद, वर्णवादी विरोधी आपल्या मुळ तत्त्वज्ञानाला विसरुन वैदिक धर्मातील कर्मकांड, अंधश्रध्दा, पुरोहितशाही इत्यादी घटकांना बळी पडला आहे. म्हणून अशा प्रकारचे संशोधन करुन त्यांना त्यांच्या भुतकाळाची व मुळ तत्त्वज्ञानाची ओळख करुन देणे गरजेचे वाटते.

गृहितके :-

१) वीरशैव लिंगायत समाज महाराष्ट्रातील इतर संप्रदायाप्रमाणे एक प्रमुख संप्रदाय असून शेकडो वर्षापासून त्याचे अस्तित्व महाराष्ट्रात आहे.

२) बार्शी परिसराच्या पर्यायाने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक विकासात वीरशैव लिंगायत समाजाने बहुमूल्य योगदान दिले आहे.

३) बार्शी शहरात वीरशैव लिंगायत समाजाचे १२ मठ अस्तित्वात असून त्यांनी बार्शी शहर व परिसराच्या धार्मिक व सांस्कृतिक उध्दारात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

४) बार्शी शहर व परिसरात वीरशैव लिंगायत समाजाच्या अनुयायांनी समाजाला जागृत करण्यासाठी पत्रकारितेच्या क्षेत्रात लक्षणीय योगदान दिले आहे.

५) बार्शी शहर व परिसरातील वीरशैव समाजाने बार्शी तालुक्याच्या राजकिय क्षेत्रात बहुमूल्य असे योगदान दिले आहे. येथील स्थानिक स्वराज्य संस्था व आमदारकीवर प्रभुत्व मिळवून लोकशाही परंपरेला बळकटी दिली आहे.

६) बार्शी शहर व परिसराच्या शैक्षणिक उध्दाराकरीता वीरशैव लिंगायत समाजाने महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यामुळे या परिसराची शैक्षणिक गुणवत्ता व दर्जा वाढण्यास मदत झाली आहे.

७) बार्शी शहरातील वीरशैव लिंगायत समाजातील महिलांनी बार्शीच्या सर्वांगीण विकासात अद्वितीय योगदान दिले आहे.

८) बार्शी येथील वीरशैव लिंगायत समाजाच्या अनुयायांनी बार्शी शहराच्या पर्यायाने महाराष्ट्राच्या साहित्यिक वैभवात भर घातली आहे. त्यांनी मराठी, हिंदी, इंग्रजी अशा अनेक भाषांमध्ये लिखाण केले आहे.

९) महाराष्ट्रातील वीरशैव लिंगायत समाजाचा प्रसार कर्नाटक राज्यापासून झाला असून त्यांच्यावर कर्नाटकातील रितीरिवाज, चालीरिती, परंपरा, श्रध्दा व संस्कृतीचा प्रभाव जाणवतो.

१०) महाराष्ट्रातील वीरशैव समाज केवळ व्यापारात मग्न न राहता महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासात कमी अधिक प्रमाणात इतर समाजा एवढेच योगदान दिले आहे.

११)महाराष्ट्रातील वीरशैव लिंगायत व वारकरी संप्रदायाचा परस्परावर प्रभाव पडलेला आहे.

संशोधन विषयाचे महत्त्व :-

उपरोक्त उद्दिष्ट्ये व गृहितके यानुसार संशोधन झाल्यास महाराष्ट्रात अल्पसंख्याक समजून दुर्लक्षीत राहिलेल्या वीरशैव लिंगायत समाजाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक योगदानावर प्रथमतः ऐतिहासिक दृष्टिकोनातून संशेधन होईल. यामुळे या समाजातील महिला व सर्वसामान्यांची कामगिरी प्रकाशात येईल. या समाजाच्या भुतकालीन वाटचाली बद्दल इतर समाजात असलेले गैरसमज दूर होऊन ‘सबलटर्न’ व ‘स्त्रीवाद’ या नविन इतिहास लेखन प्रवाहांना बळ मिळेल.

वीरशैव लिंगायतांना त्यांच्या पुर्वजांच्या कर्तृत्वाची व मूळ तत्वज्ञानांची ओळख होऊन त्याप्रमाणे समताधिष्ठित, वर्ण व जात विरहित नवसमाज निर्मिती करण्याची प्रेरणा मिळेल. शिवाय बार्शी शहराचा स्थानिक इतिहास सर्वज्ञ होण्यास मदत होईल.

संशोधन कार्यपद्धती व तथ्यसंकलन :-

प्रस्तुत संशोधनासाठी प्रामुख्याने ऐतिहासीक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात येईल. यासाठी निरीक्षण, सर्व्हेक्षण, मुलाखत, प्रश्नावली या संकलन पद्धतीचा उपयोग करुन वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीने तथ्यांचे विश्लेषण केले जाईल. उपलब्ध साधनांचा अन्वयार्थ काढताना अंतरंग व बाह्यरंग परीक्षण केले जाईल.

अभ्यासासाठी तथ्यसंकलन हा अतिशय महत्त्वाचा भाग असून त्यासाठी प्राथमिक व दुय्यम साधनसामग्रीचा उपयोग केला जाईल. वीरशैव लिंगायत समाजाशी संबंधीत असलेल्या विविध घटनास्थळे, व्यक्ती, ग्रंथालये, ऐतिहासिक वास्तू, धार्मिक, राजकीय व सामाजिक संस्था यांना प्रत्यक्ष भेटून मुलाखत किंवा प्रश्नावली या संकलन पद्धतीचा उपयोग करुन माहीती मिळवली जाईल. याशिवाय विविध शिलालेख, ऐतिहासिक दस्ताऐवज, मासिके, अनेक संस्थांचे अहवाल यांचा प्राथमिक सामुग्री म्हणून तर यापूर्वी केलेल्या संशोधनपर ग्रंथांचा, शोधनिबंधांचा व प्रबंधांचा व इतर संदर्भग्रंथांचा दुय्यम साधन म्हणून उपयोग करण्यात येईल.

प्रकरणाची वर्गवारी :-

१) विषय प्रवेश :-

या प्रकरणामध्ये अभ्यासाचे महत्त्व, अभ्यासाची उद्दिष्टे, गृहितके, पुर्व संशोधनाचा आढावा, अभ्यास पद्धती, विषयाची व्याप्ती, स्वरुप व मर्यादा, तथ्य संकलनाच्या पद्धती व स्वरुप याबद्दल विस्तृत माहिती असेल.

२) बार्शी परिसराचा इतिहास :-

या प्रकरणात बार्शी शहराचा इतिहास येथील सामाजिक व आर्थिक परिस्थिती वेगवेगळ्या धार्मिक, राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक संस्था, बार्शी शहराचे भौगोलिक महत्त्व, पूर्व इतिहास, येथील भगवंत मंदीर, बारा ज्योर्तिलींग मंदीर, एकविराई मंदीर, नगरपालिका न्यायालय व व्यापार पेठ यांचा ऐतिहासीक दृष्टीकोनातून थोडक्यात आढावा घेतला जाईल.

३) वीरशैव लिंगायत समाजाची ऐतिहासिक पार्श्वभूमी :-

या प्रकरणात वीरशैव लिंगायत संप्रदायाचा उदय, १२ व्या शतकातील उत्तर कर्नाटकातील कल्याण क्रांती, महाराष्ट्रातील प्रचार व प्रसार, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा, कोकण व खानदेशातील त्यांची सद्यस्थिती, महाराष्ट्रातील त्यांचे महत्त्वाचे ठिकाण, रितीरिवाज, परंपरा, श्रध्दा, दैवत व धार्मिक विचारसरणी बद्दल थोडक्यात माहिती घेतली जाईल.

४) बार्शी परिसरातील वीरशैव लिंगायताचे राजकीय व वैद्यकीय क्षेत्रातील कामगिरी :-

या प्रकरणामध्ये वीरशैव लिंगायत समाजातील स्त्री व पुरूषांनी बार्शी शहराच्या राजकारणात व वैद्यकीय क्षेत्राच्या विकासात केलेल्या योगदानाचा आढावा घेतला जाईल. बार्शी येथील वीरशैव लिंगायत समाजातील कथले व हिरेमठ कुटुंबांनी बार्शी शहरात अनेक दवाखान्यांची स्थापना करुन बार्शी शहराच्या वैद्यकिय क्षेत्राचा विकास केला. कथले कुटुंबियांनी सुप्रसिध्द कर्करोग दवाखान्यासाठी जागा दिलेली आहे.

बार्शी शहर व परिसरातील वीरशैव समाजातील पुरूष व महिलांनी बार्शी तालुक्याच्या राजकीय क्षेत्रात बहुमूल्य असे योगदान दिले आहे. येथील स्थानिक स्वराज्य संस्था व आमदारकीवर प्रभुत्व मिळवून लोकशाही परंपरेला बळकटी दिली आहे.

१) कै. नागन्नाथ संभूप्पा उर्फ बाबासाहेब कथले, नगरपालिका अध्यक्ष १९१८-१९

२) कै. सिद्रामाप्पा संभूप्पा कथले, नगराध्यक्ष १९१९ ते १९२१

३) श्री. श्रीराम भाऊसाहेब झाडबुके

४) श्रीमती. प्रभाताई झाडबुके

५) दिलीप गंगाधर सोपल

६) श्रीमती गौरव्वा गणपतराव झाडबुके

७) भिमराव शंकराप्पा बगले

उपरोक्त व इतर वीरशैव लिंगायत समाजातील स्त्री व पुरूष नेत्यांच्या कामगिरीचा आढावा घेतला जाईल.

५) बार्शी परिसरातील वीरशैव लिंगायतांची पत्रकारीता :-

या प्रकरणात बार्शी शहर व परिसरातील वीरशैव लिंगायत समाजातील स्त्री व पुरूष पत्रकारांनी केलेल्या कामगिरीचा आढावा घेतला जाईल. या समाजात पत्रकारीतेची एक अखंड अशी परंपरा आहे. **पारलिंग प्रभुअप्पा जंगम** यांच्यापासुन सध्याचे अशोक मठपतीपर्यंत ती चालु आहे. प्रतिकुल परिस्थितीशी झुंज देत समाजाला जागृत ठेवण्याचे काम यांनी केले.

१) साप्ताहीक प्रबोधरत्न	: संपादक कै. पारलिंग प्रभूअय्या जंगम-१८८५
२) वीरप्रभा	: संपादक सौ.त्रिवेणीबाई विसापूरे-१९२५
३) वीरशैव गर्जना	: संपादक कै.राचलिंग शिवाचार्य परंडकर महाराज-१९३२
४) दैनिक बार्शी समाचार	: संपादक महादेव शिवलिंग मठपती-१९५५
५) साप्ताहिक बार्शी संचार	: संपादक शिवलिंग महादेव मठपती-१९७९

यांनी केलेल्या कामगिरीचा आढावा घेतला जाईल.

६) बार्शी परिसरातील वीरशैव लिंगायतांचे सांस्कृतिक कार्य :-

या प्रकरणात बार्शी शहर व परिसराच्या धार्मिक, सांस्कृतिक, साहित्यिक, आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकासात वीरशैव समाजाने दिलेल्या योगदानाचा आढावा घेतला जाईल बार्शी येथील १२ वीरशैव लिंगायत मठांनी धार्मिक, सांस्कृतिक

व शैक्षणिक क्षेत्रात केलेली कामगिरी, 'लिंगायत बोंर्डींग' व 'कै. नगरभूषण श्रीमान भाऊसाहेब झाडबूके' यांनी स्थापन केलेले 'बार्शी शिक्षण प्रसारक मंडळ' या संस्थेद्वारे स्थापन केलेले व चालविले जाणारे श्रीमान भाऊसाहेब झाडबूके महाविद्यालय बार्शी व इतर अनेक संस्थांचा शैक्षणिक क्षेत्रातील कामगिरीचा आढावा घेतला जाईल.

वीरशैव लिंगायत समाजातील लोकांनी महाराष्ट्राच्या साहित्य, कला क्षेत्राच्या विकासात दिलेल्या योगदान दिले आहे.

'श्री.भगवंत महात्म्य'	:	राजाभाऊ कथले
१) 'The Weart of Virshaivism' व 'Essentials of Samadhi Shatak'	:	प्राध्यापक बाबूराव चमके
२) 'Law Related to Marriage & Divorce', 'Maharashtra Regional Town Planning'	:	श्री.ए.बी.पुराणिक

यांनी बार्शीच्या साहित्यिक क्षेत्राच्या विकासात दिलेल्या योगदानाचा आढावा घेतला जाईल.

७) उपसंहार :-

या प्रकरणात प्रस्तुत अभ्यासाचा सारांश, निष्कर्ष, वीरशैव लिंगायत समाजाने केलेल्या कामगिरीचे मुल्यमापन, महत्त्व सांगितले जाईल. या समाजाचे भविष्याबद्दल सुचना केले जाईल.

संदर्भग्रंथ :-

१) वीरशैव विश्वकोष	:	डॉ.सुधाकर मोगलेवार
२) वीरशैव धर्मपंथ इतिहास व तत्त्वज्ञान	:	डॉ.सुधाकर मोगलेवार
३) वीरशैव व इतर धर्म आणि समाज	:	डॉ.सुर्यकांत घुगरे
४) बाराव्या समाजातील आद्य समाजसुधारक मा.बसवेश्वर	:	डॉ.अशोक मेणकुदळे
५) कल्याण क्रांती	:	माते महादेवी
६) राणी चिन्नम्मा	:	डॉ.चिटणीस
७) बसव दर्शन	:	बसव समिती
८) पेशव्यांचे विलासी जीवन	:	वर्षा शिरसगावकर
९) भारतीय संप्रदाय	:	अभ्यंकर शंकर वासूदेव
१०) मराठी कालीन ऐतिहासिक साधने	:	इतिहासाचार्य राजवाडे
११) स्मृती ग्रंथ बार्शी नगरपालिका शतकोत्तर रौप्यमहोत्सव १८६५ ते १९९०	:	स्मरणिका गौरवग्रंथ समिती नगरपालिका बार्शी

संशोधक — **प्रा. पंतुलवार आर.जी.**

मार्गदर्शक — **डॉ. विजय पांडुरंगराव कुलकर्णी**

वै.धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालय, देगलुर